फोटो आहे.
प्रकाश क्षीरसागर यांना
कुसुमाग्रज पुरस्कार जाहीर

पणजी, ता. गोमंतकीय गजलकार व साहित्यिक, पत्रकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना नाशिक (महाराष्ट्र) येथील नाशिक कवी संस्थेचा कवी कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री. क्षीरसागर यांच्या झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता या गजलसंग्रहाला हा पुरस्कार जाहीर झाला आहे.
रोख रक्कम, प्रमाणपत्र, योग्य सन्मान असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या रविवारी २६ जुलै रोजी नाशिक येथील कवी कुसुमाग्रज सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. पत्रकार साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते पुरस्कार वितरित होतील. श्री. क्षीरसागर यांच्या रुसू नकोस पावसा या कवितेलाही छंदोबद्ध कवितांच्या स्पर्धेत पारितोषिक मिळाले आहे. डॉ. शंतनू चिंधडे आणि प्रा. स्मिता पाटील (ठाणे) यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. कवी कुसुमाग्रज यांच्या स्मरणार्थ दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. गर्भावल्या संध्याकाळी आणि मातीचे डोहाळे (माती पाऊस आणि सखी) हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध असून सीताराम महाराज चरित्रामृत हा चरित्रग्रंथही प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्याला अंकुर साहित्य संघ, आशीर्वाद पुरस्कार मुंबई, बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळ पुरस्कार आदी पुरस्कार तसेच गोमंतक मराठी साहित्य परिषदेचा असे विविध पुरस्कार मिळाले आहेत.